



Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com






वर्ष ३ रे | अंक : ७४७. वा | सोमवार | दि. २२ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये


# शिवसेनेत प्रवेश केला म्हणून जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षाकडून युवकास बेदम मारहाण

## जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षासह त्यांच्या कुंटुबाविरोधात गुन्हा दाखल

**जनसंचलन/मलकापूर**

राज्यासह देशात अठराव्या लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतांना बुलढाणा जिल्ह्यातील मलकापुर येथे एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गावातील नातेवाईक असलेल्या युवकाने आपल्या मित्रासह शिवसेनेत ( ) प्रवेश केल्यामुळे या युवकास जबर मारहाण करण्यात आलीय. या युवकाला घरी बोलावून बुलढाणा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा उमा तायडे, त्यांचे पती शिवचंद्र तायडे आणि मुलगा तेजस तायडे यांनी ही जबर मारहाण केलीय. यात युवक जखमी झाला असून त्याच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना उघडकीस येताच परिसरात एकच खळबळ उडाली असून पिडीत युवकाच्या आईच्या तक्रारीवरून मलकापूर ग्रामीण पोलिसांनी गुन्ह्यांची नोंद करण्यात आलीय. मलकापूरपोलिसाततिघांविरुद्धगुन्हादाखलकेलाआहे बुलढाणा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा उमा तायडे या भाजपचा नेत्या आहेत. सोबतच त्यांचे पती शिवचंद्रा तायडे हे देखील भाजप पक्षात काम करतात. दरम्यान, पीडित मुलाने भाजपचेच काम करावं, इतर पक्षामध्ये जाऊ नये, अशी मागणी तायडे दाम्पत्याकडून करण्यात आली होती. मात्र, तसं न करता काही दिवसापूर्वी मलकापुर येथील रहिवासी असलेल्या आणि तायडे दाम्पत्याचा नातेवाईक असलेला या तरुणाने शिंदे गटाच्या शिवसेनेत पक्ष प्रवेश केला. कालांतराने ही बाब उमा तायडे यांना कळली. त्यावरून त्यांनी या युवकला घरी बोलावून जाब विचाराला. त्यानंतर या युवकाला जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा उमा तायडे, त्यांचे पती शिवचंद्र तायडे आणि मुलगा तेजस तायडे यांनी ही जबर मारहाण केली. यात युवक जखमी झाला असून सध्या त्यावर उपचार सुरू आहे.या प्रकरणाची माहिती मिळताच पोलिसांनी पीडित



मुलाच्या तक्रारी वरुन गुन्हा दाखल केला आहे. यात मलकापूर ग्रामीण पोलिसांनी कलम क्रमांक ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ नुसार गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू केलाय.

---

# मातृतीर्थ सिंदखेडराजा, खामगावात संदीप शेळकेंची लक्षवेधीप्रचार रॅली !

## प्रस्थापितांनी आजवर जनतेची फसवणूक केल्याचा शेळकेंचा आरोप,म्हणाले तुम्ही बदल घडवा मी जिल्हा घडवितो!

**जनसंचलन/सिंदखेडराजा**

बुलडाणा प्रस्थापित राजकारण्यांनी सत्तेसाठी राजकारण केले. निवडणुक आली की त्यांना सामान्या जनता आठवते. विकासाची भाषा कधी त्यांनी केली नाही. केवळ जिल्ह्यातील जनतेची फसवणूक त्यांनी केली आहे. त्यामुळे तुम्ही बदल घडवा, मी जिल्हा घडवितो असे आवाहन संदीप शेळके यांनी केले. काल मातृतीर्थ सिंदखेडराजा, खामगाव येथे संदीप शेळके यांच्या प्रचारासाठी भव्य रोडशो काढण्यात आला. दरम्यान जनतेशी संवाद साधताना ते बोलत होतो. अपक्ष उमेदवार तथा वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांचा जिल्हाभर धुमधडाक्यात प्रचार सुरू आहे. ठिकठिकाणी त्यांचा रोडशो चे आयोजन करण्यात येत आहे. जेसीबीने पुष्पृष्टी करत शेळकेंचे स्वागत करण्यात येत आहे. विकासाच्या मुद्द्यांवर बोलत असल्याने शेळकेंना भरभक्रम प्रतिसाद मिळत आहे. पुढे बोलताना संदीप शेळके म्हणाले की, मी वन बुलढाणा मिशन च्या माध्यमातून ७० संवाद मेळावे घेतले, सोयाबीन कापसाच्या भाव वाढीसाठी पदयात्रा काढली, पाचशे पेक्षा आधिक गावात परिवर्तन रथयात्रा काढली, जवळपास सातशे पेक्षा अधिक गावांना आतापर्यंत भेटी दिल्या. आणि जेव्हा विद्यमान खासदार म्हणतात मला १५० दिवस संसदेत रहावे लागते तर मला हसू येते. गेल्या सहा महिन्यात मी संपूर्ण बुलढाणा जिल्हा पिंजून काढला आहे. प्रस्थापित राजकारण्यांनी आजवर सत्तेसाठी राजकारण केलेले आहे. निवडणूक आली की त्यांना सामान्य जनतेची आठवण येते. असा आरोप शेळके यांनी केला. त्यामुळे जनतेने बदल घडवून परिवर्तन घडविले पाहिजे, मी निश्चितपणे जिल्हा घडवण्यासाठी कटिबद्ध आहे असे शेळके म्हणाले. खासदार झाल्यावर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एमआयडीसी आपण उभारणार आहोत, शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी तालुक्यात सीड हब उभारणे, पांदण रस्त्याची निर्मिती करणे, सिंचनाची टक्केवारी वाढवणे यासाठी आपण प्रामुख्याने प्राधान्य देणार आहोत, तरुण भावांना सैन्य भरतीच्या तयारीसाठी मैदान उपलब्ध करून देणार आहोत, माता भगिनींसाठी बचत गटातून ऑनलाइन बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आपण विशेष प्रयत्न करणार आहोत, जिल्ह्याला पर्यटन दृष्ट्या



विशेष महत्त्व असले तरी आजवर पाहिजे तसा विकास झाला नाही. बुलढाणा जिल्हा पर्यटन हब बनवण्याचे आपले ध्येय आहे, जिल्ह्यात कारखानदारी वाढली पाहिजे, पैठणच्या धरतीवर शेगावात संतपीट साकारल्या गेले पाहिजे, यासह विविध अभ्यासपूर्ण धोरणांतून बुलढाणा जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करून दाखवणार असेही शेळके म्हणाले.

# राज्य उत्पादन शुल्कची निवडणूक काळात धडाकेबाज कारवाई...

## १९ दुचाकी,१ इर्टीगासह ३२ लाख रुपयांचा मुद्देमाल केला जप्त

**जनसंचलन/बुलडाणा**

राज्य उत्पादन शुल्क विभागाने लोकसभा निवडणूक काळात कारवाई सुरू केली आहे. आचारसंहिता कालावधीत आतापर्यंत १९ दुचाकी आणि एका इर्टीगा वाहनासह ३२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अधीक्षक भाग्यश्री जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहिम राबविण्यात आली. या कालावधीत एकुण १९६ गुन्हे नोंदविण्यात आले असून १९२ वारस गुन्ह्यात १९९ आरोपींना अटक करण्यात आली. तसेच २० बाहनासह एकूण ३१ लाख ९५ हजार ६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या गुन्ह्यांमध्ये देशी मद्य ९७९.७७ लिटर, विदेशी मद्य १३३.२ लिटर, बिअर ५१.९५ लिटर, ताडी १४८ लिटर, रसायन सडवा २६ हजार ४१० लिटर, हातभट्टी १ हजार ६५७ लिटर जप्त करण्यात आले आहे. राज्य उत्पादन शुल्कच्या भरारी पथकाने शनिवार, दि. २० एप्रिल २०२४ रोजी किनगाव राजा, ता. सिंदखेडराजा येथे २ गुन्ह्यांमध्ये एक ईर्टीगा चारचाकी वाहन क्रमांक एमएच १४ जेएम ६१९७ आणि १ मोटर सायकल क्रमांक एमएच २८ एसी ७९६२ यामध्ये एकुण ४३.२ लिटर देशी मद्य पकडुन एकुण ६ लाख ९६ हजार ८१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या गुन्ह्यामध्ये रविकुमार रामदास चाटे, वय ३३, रा. निमगाव वायाळ आणि शरद दत्तात्रय जाधव, वय ४०, रा. किनगावराजा, ता. सिंदखेडराजा यांना अटक करण्यात आली. याप्रकरणी निरीक्षक आर. एम. माकोडे, दुय्यम निरीक्षक आर. आर. उरकुडे, जवान नि वाहनचालक मोहन जाधव, जवान पी. एच. पिंपळे यांनी सहभाग घेतला होता.

राज्य उत्पादन शुल्कचे दुय्यम निरीक्षक यांनी येळगाव शिवारात १ मोटर सायकल वाहनासह ८.६४ लिटर देशी मद्य पकडुन एकुण २३ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यात विपुल प्रकाश साळवे, रा. बुलडाणा याला अटक करण्यात आली



आहे. याप्रकरणी दुय्यम निरीक्षक आर. के. विठोरे, व जवान एस. बी. निकाळजे यांनी सहभाग घेतला. परिसरात अवैध मद्य विक्री अथवा बनावट मद्य निर्मिती आढळल्यास या विभागास टोल फी नंबर १८००२३३९९९९ वर किंवा व्हॉटअॅप नंबर ८४२२००११३३ वर किंवा excisesuvidha.mahaonline.gov.in या विभागाचे पोर्टलवर तात्काळ माहिती कळवावी, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाने केले आहे.

# भरदिवसा मलकापूर शहरात साडेपाच लाखांचा ऐवज लंपास



**जनसंचलन/मलकापूर**

बंद असलेल्या घरातून सुमारे साडे पाच लाखांचा सोन्या, चांदीचा ऐवज लंपास केल्याची घटना शनिवारी उघडकीस आली. येथील हरी किरण सोसायटीत भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माजी जिल्हा परिषद सदस्य केदार एकडे व नितीन एकडे हरिकिरण सोसायटीत वास्तव्याला आहेत. शनिवारी सकाळी पारिवारिक कार्यक्रमाच्या निमित्ताने सकाळीच दोघेही बंधू घराबाहेर पडले होते. दुपारी ३ वाजताच्या सुमारास घरी परतल्यावर तळमजल्यावर संशयास्पद गोष्टी आढळून आल्या. घराची झाडाझडती घेतली असता सोन्या-चांदीचा ऐवज लंपास झाल्याचे दिसून आले. त्यात सोन्याचे मोठे मंगळसूत्र, लहान मंगळसूत्र, बांगड्या, कानातले असे १२६ ग्रॅम किमतीचे ५ लाख ४ हजार व १ किलो वजनाची चांदीच्या भांडी असा ५ लाख ४४ हजारांचा ऐवज लंपास झाल्याचे दिसून आले. या प्रकरणी नितीन काशिनाथ एकडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला आहे.

# वीज कोसळली त्यामध्ये दोन गुरे ठार झाली



**जनसंचलन/ डोणगांव**

येथून जवळच असलेल्या नागापूर येथे २० एप्रिलच्या रात्री शेतातील गोठ्यावर वीज कोसळली. त्यामुळे गोठ्याला आग लागून या आगीत एक गाय आणि एक म्हैस जळून खाक झाली. तसेच एक गाय आणि एक बैल ९० टक्के भाजला आहे. गोठ्यातील साहित्यही जळाल्याने शेतकऱ्याचे सहा लाख ५७ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. डोणगाव परिसरात २० एप्रिल रोजी रात्री विजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस झाला. या पावसादरम्यान नागपूर येथील माधव प्रकाश गायकवाड यांच्या गोठ्यावर वीज कोसळली. त्यामुळे गोठ्याला आग लागून यामध्ये एक गाय आणि एक म्हैस जळून खाक झाली. तसेच एक गाय आणि एक बैल ९० टक्के भाजला आहे, या गोठ्यात असलेले स्प्रिंकलरचे दोन संच आणि पीयूसी पाईप, जनावरांचे खाद्य, हळद आणि इतर साहित्य असा ६ लाख ५७ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच माजी कृषी सभापती राजेंद्र पळसकर व शिवसेना शहर प्रमुख सुरज दिनोरे, नागापूर सरपंच समाधान गायकवाड तसेच तलाठी व पशुसंवर्धन अधिकारी घटनास्थळी यांनी भेट दिली आहे

# भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नडडा यांनी घेतली बुलडाणा जिल्ह्यातील वरवट बकाल येथे प्रचारार्थ सभा

**जनसंचलन/बुलढाणा**

भारत देश हा २०२७ मध्ये तिसरी मोठी अर्थ व्यवस्था बने मेक इन इंडीया माध्यमातुन रोजगार निर्मितीचे कार्य मोदी सरकारच्या कार्यकाळात सुरु आहे असे प्रतिपादन भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नडडा यांनी बुलडाणा येथे केले बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या प्रचारार्थ भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांची सभा बुलढाणा जिल्ह्यातील वरवंड बकाल येथे आयोजित करण्यात आली होती यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर राज्याचे पाणी पुरवठामंत्री गुलाबराव पाटील उमेदवार प्रतापराव जाधव खा रक्षाताई खडसे आमदार संजय कुटे आमदार आकाश फुंडकर श्वेताताई महाले यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नडडा पुढे म्हणाले की विकासाच्या माध्यमातून देशाला पुढे नेण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहे तर दुसरीकडे इंडिया आघाडी भ्रष्टाचारांना वाचवण्याचे काम असल्याचा आरोप त्यांनी केला इंडीया आघाडीच्या टु जी घोटाळा नोकरी घोटाळा कोयला घोटाळा चारा घोटाळ्याचा यावेळी त्यांनी उल्लेख केला आहे हम आयेंगे मंदिर वही बनायेंगे लेकीन तारीख नही बतायगे



अशी स्थिती होती मोदी यांच सरकार येण्यापुर्वी देशात होती पण मोदींच्या कार्यकाळामध्ये राम मंदिर बनवण्याचा मार्ग मोकळा झाला आणि राम लल्ला अयोध्या नगरी विराजमान झाले हे काम मोदी केल्याच त्यांनी सांगितले देशातील जनतेने मोदीजी यांच्या हातात स्थिर सरकार दिल्यामुळे विकासाची कामे संपूर्ण देशभर सुरू आहे तेव्हा पुन्हा एकदा मोदीजींचे हात बळकट करण्यासाठी महायुतीच्या उमेवारांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले या देशातील गोरगरीब उपेक्षित शोषित युवा वर्गाला खऱ्या अर्थाने कोणी मदत केली असेल तर ती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. या जिल्ह्यातील साडेतीन लाख लोकांना अन्न देण्याच्या सरकारने केले आहे. उज्वला योजने ५२ हजार कलेक्शन जिल्ह्यात दिल्या गेले. हर घर नल योजने अंतर्गत या ७५ लोकांना नळ कनेक्शन दिल्या गेले. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत चार करोड लोकांना पक्के घरे बांधून देण्यात आली. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आपण पंतप्रधान पुन्हा बनवले तर आणखीन ३ करोड नागरिकांना ही घरे मिळणार असत्या चे त्यांनी सांगीतले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# विवाहितेचा केला विनयभंग आरोपीविरुद्ध गुन्हा...



**जनसंचलन/बुलढाणा**

विवाहितेचा विनयभंग करून मारहाण तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी एका दाम्पत्याविरुद्ध विविध कलमान्वये २१ एप्रिल रोजी बुलढाणा शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुलढाणा शहरातील एका भागात राहणाऱ्या महिलेचा नीलेश सुरेंद्र बोरकर याने विनयभंग केल्याचे पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. तसेच पीडित महिला व तिची आई याविषयी जाब विचारण्यासाठी गेली असता, नीलेश बोरकर व त्याची पत्नी रेखा बोरकर यांनी दोघींनाही जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. त्यावरून पोलिसांनी दोघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास बुलढाणा शहर पोलिस करीत आहेत. गत काही दिवसांपासून बुलढाणा शहरात गुन्ह्याचे प्रमाण वाढल्याचे चित्र आहे. त्यावर उपाय योजना करण्याची गरज आहे.

# उत्कृष्ट कार्य करणाऱ्या देऊळगाव माळी येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांचा गावकऱ्यांनी केला सत्कार

**जनसंचलन/मेहकर**

प्राथमिक आरोग्य केंद्र देऊळगाव माळी येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनील सुलताने व आरोग्य केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे ते करत असलेल्या उत्कृष्ट रुग्णसेवा, तसेच इतरही रुग्णांना पुरवण्यात येणाऱ्या सुविधा या उत्कृष्ट दर्जाच्या आहे. आणखीन या कार्यामध्ये प्रेरणा मिळावी या उद्देशाने डॉक्टर असोसिएशन, विविध मंडळ, गावकरी यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डी. व्हि.सुरूशे, व क्रांतीसुर्य तालीम संघाचे अध्यक्ष किसन बळी यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र देऊळगाव माळी येथे उपलब्ध सुविधा, त्याचबरोबर आरोग्य सेवा, स्वच्छता, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया, व पुरुष नसबंदी, व आरोग्य केंद्राचा सुरळीत मिळणाऱ्या सुविधा याबाबत आपले मत व्यक्त केले. यावेळी क्रांतीसुर्य क्रीडा तालीम संघ, योग प्राणायाम समिती, मारुती गणेश मित्र मंडळ, शिव सावता गणेश मंडळ, सावता माळी मित्र मंडळ, गणपती संस्थान, माऊली गणेश मंडळ, यांचे पदाधिकारी कार्यकर्ते त्याचबरोबर गावकरी उपस्थित होते. गावकऱ्यांनी केलेल्या सत्काराचा मी



ऋणी असून, गावकऱ्यांनी जो सत्कार केला यामुळे आणखीन चांगले कार्य करण्याची प्रेरणा मिळते. यापेक्षाही अधिक आरोग्य सेवा आमच्या आरोग्य केंद्रातून नागरिकांना कशा पुरवल्या जाईल याकडे आम्ही लक्ष देऊ.

# विना क्रमांकाच्या टिप्परने रेतीची अवैध वाहतूक सुसाट

## वाळू उपसा रोखण्यासाठी महसूल विभागाकडे निवेदन : दखल घेण्याची मागणी...

**जनसंचलन/ लोणार**

मराठवाड्यातील पूर्णा नदीच्या पात्रातून रेतीचा अवैध उपचार करून विना क्रमांकाच्या टिप्परने वाळूची भरधाव वाहतूक करण्यात येत आहे त्यामुळे, अपघात घडत असून अनेकांना अपंगत्व येत आहे याकडे आरटीओ, महसूल आणि पोलिस विभागाचे दुर्लक्ष होत आहे या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी लोणार तालुका काँग्रेसचे अध्यक्ष राजेश मापारी यांनी राज्याचे पोलिस महासंचालक तथा जिल्हाधिकारी बुलढाणा यांना दिलेल्या निवेदनात केली आहे मराठवाड्यातील मंठा तालुक्यातील तळनी परिसरातील पूर्णा नदीपात्रात मोठ्या प्रमाणात वाळूचा उपसा सुरू आहे विशेष म्हणजे विना क्रमांकाच्या टिप्परने रेतीची वाहतूक सुरू आहे लोणारमार्गे ही रेती विदर्भात पोहोचवण्यात येत आहे वाळूची वाहतूक करणारे अल्पवयीन चालक भरधाव वेगाने आपली वाहने शहरातून पळवत आहे. दरम्यान, रस्त्याने चालणाऱ्या दुचाकीस्वारांना, पादचाऱ्यांना, आपले जीव गमवावे लागत आहे. महिनाभरात रेती वाहतूक करणाऱ्या वाहनाने झालेल्या अपघातात दोन तरुणांचा मृत्यू झाला आहे. महिनाभरात दोन घटना घडूनही शहरातील वाळूची खुलेआम वाहतूक जोमात सुरू आहे. याकडे प्रशासनाने आपले पूर्ण दुर्लक्ष केले आहे. अवैध वाळूच्या वाहतुकीसंदर्भात अनेक तक्रारी स्थानिक नागरिकांनी तहसीलदार आणि



पोलिस निरीक्षक यांना लेखी स्वरूपात दिल्यानंतरही अवैध वाळूची वाहतूक बंद झालेली नाही. मराठवाड्यातून लोणारमार्गे विनानंबरच्या ७० वाहनांतून वाळूवाहतूक सुरू तरी कशी आहे, हे न समजण्यापलीकडचे आहे. या प्रकरणी जबाबदार असलेल्या महसूल, पोलिस आणि उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिका-यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी लोणार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेश मापारी, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष गजानन खरात, माजी नगरसेवक सूदन कांबळे, यांनी राज्याचे पोलिस महासंचालक तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. अवजड वाहनातून वाळूची अवैधरित्या वाहतूक सुरु असल्याचे चित्र आहे. एका पासवर सहा ते सात टिप्पर एकाच ई पासवर तब्बल सहा ते सात टिप्पर दिवसभर वाळूची अवैध वाहतूक करतात या वाहनांची ई पास तपासण्यासाठी महसूल विभागाकडे वेळच असल्याचे चित्र आहे मराठवाड्यातील रेती लोणारमार्गे विदर्भात पोहोचवण्यात येते सर्वसामान्यांना ही रेती चढ्या दराने विक्री करण्यात येत असल्याचे चित्र आहे तक्रारीनंतर कारवाई नाही पूर्णा नदीपात्रातून बेसुमार वाळू उपसा होत असल्याची वारंवार तक्रारी महसूल प्रशासनाकडे केली जात आहे. त्यानंतरही कारवाई केली जात नसल्याचे चित्र असून यामुळे तक्रारदारांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. रॉयल्टी पेक्षा अधिक वाळू उपसा केला जात असल्याचे प्रकर्षाने दिसून येत आहे. संबंधितांनी याकडे लक्ष पुरविण्याची मागणी परिसरातील जनतेतून होत आहे.

# खा. प्रतापराव जाधव यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची महासभा उद्या

**जनसंचलन/ खामगाव**

बुलडाणा लोकसभा मतदार संघातील महायुतीचे लोकसभा उमेदवार खासदार प्रतापराव जाधव यांचा विजय सुकर होण्याच्या दृष्टीकोनातून महायुतीच्या वतीने जिल्ह्याभरात प्रचाराचा झंझावात सुरु आहे. महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या प्रचारार्थ राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सभेचे खामगाव येथे आयोजन करण्यात आले आहे. ही सभा २३ एप्रिल रोजी जे. बी. मेहता हायस्कूल मैदानात सायं ५ वाजता घेण्यात येणार आहे. या महासभेला महायुतीचे सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघाचे आमदार राजेंद्र शिंगणे, जळगांव जामोद मतदार संघाचे आमदार संजय कुटे, मेहकर विधानसभा मतदार संघाचे आमदार संजय रायमुलकर, खामगांव मतदार संघाचे आमदार आकाश फुंडकर, बुलढाणा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड, चिखली



मतदार संघाच्या आमदार श्वेताताई महाले, आमदार वसंतराव खंडेलवाल, आमदार किरण सरनाईक, माजी खासदार सुखदेव नंदाजी काळे, माजी आमदार सर्वश्री भारतभाऊ बोंद्रे, चैनसुख संचेती, विजयराज शिंदे, तोताराम कायंदे, धृपदराव सावळे, शशीकांत खेडेकर, हे उपस्थित राहणार आहेत. या बैठकीला बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील महायुतीमध्ये समाविष्ट असलेले शिवसेना, भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रवादी काँग्रेस, रीपाई. (आठवले गट), पि.रि.पा. व रयत क्रांती संघटना, रा.स.पा, तसेच मित्रपक्षांच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी बैठकीला उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आली आहे.

# चिंचोली येथील १७ वर्षांचा मुलगा बेपत्ता

**जनसंचलन/ शेगाव**

तालुक्यातील चिंचोली येथील १७ वर्षांचा मुलगा बेपत्ता झाल्याची घटना १९ एप्रिल रोजी याबाबत रात्री उघडकीस आली. मुलाची आई सौ. संगीता संघपाल इंगळे वय ४० यांनी पोलिसात फिर्याद दिली की, १९ एप्रिल रोजी रात्री ८.३० वाजता माझा मुलगा सम्यक संघपाल इंगळे वय १७ वर्ष ५ महीने रा. चिंचोली ता. शेगांव हा दळण आणने करीता गावातील चक्कीवर गेला होता. तेव्हापासून तो घरी परत आला नाही. त्यामुळे फिर्यादी व फिर्यादीचे पती व नातेवाइक




यांनी त्याचा गावामध्ये व नातेवाइकाकडे शोध घेतला असता तो मिळुन आला नाही. तो कोठे गेला हे माहीत नाही. त्यास कोणी तरी फुस लावून पळून नेले असावे असा संशय आहे. अशा तोंडी रिपोर्टवरुन अज्ञात आरोपीविरुद्ध अप नं १३४/२०२४ कलम ३६३ भादवि नुसार गुन्हा दाखल करण्यात आला

# जळगावमधील त्या प्रसिद्ध ज्वेलर्सवर आयकर विभागाची धाड...

## चौकशीदरम्यान सापडले लाखो किलो सोनं...

वृत्तसंस्था/जळगाव खा.

जळगाव सुवर्ण नगरीतील आणखी एक प्रसिद्ध ज्वेलर्स आयकर विभागाच्या रडारवर आलं आहे. आर सी बाफना ज्वेलर्सवर आयकर विभागानं धाड टाकली. लोकसभेच्या पार्श्वभूमीवर तपासणी दरम्यान, बाफना ज्वेलर्सकडे ८ ते ९ किलो सोने आढळलं. जळगाव शहरातील आर सी बाफना ज्वेलर्सच्या नयनतारा शोरुममध्ये, काल रात्री आयकर विभागाच्या पथकानं चौकशी केली. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तपासणी सुरू असताना ८ ते ९ किलो सोने चौकशीत आढळून आले असून हे सोने आर सी बाफना ज्वेलर्स असल्याची माहिती समोर आली आहे. जळगाव शहरातील रतनलाल सी. बाफना ज्वेलर्सचे नयनतारा शोरुममध्ये रात्री आयकर विभागाच्या पथकाने चौकशी केली. काही महिन्यांपूर्वी पुण्यातील प्रसिद्ध नीळकंठ ज्वेलर्सवर आयकर विभागाने धाडी टाकल्या होत्या. पत्र्या मारुती चौकातील ज्वेलर्सची झाडाझडती करण्यात आली. हडपसर, मगरपट्टा, बाणेर भागातही आयकरने धाडी टाकल्या. आयकर विभागाकडून पहाटेपासूनच ही छापेमारी सुरू झाली. आयकर विभागाचे अधिकारी ४० वाहनांमधून छापासत्रासाठी दाखल झाले होते. सोन्याच्या भावात आजपर्यंतची सर्वाधिक वाढ झाली आहे. त्यामुळे सोनं जवळपास सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर गेल्याचं बोललं जातंय. सुवर्णनगरी अशी ओळख असलेल्या जळगावमध्ये सोन्याचा भाव तब्बल ७६ हजार तिनशे रुपये प्रति तोळा इतका सह नोंदवला गेला. तर चांदी ८६ हजार पाचशे रुपये प्रति किलो सह आहे. एकीकडे बँकांचे स्थीर व्याजदर आहेत,




दुसरीकडे आंतरराष्ट्रीय बाजारात इतर देशांचाही सोने खरेदीकडे कल वाढलाय. त्यामुळे सोन्याच्या दरात वाढ झाल्याची माहिती सुवर्ण व्यावसायिकांनी दिली. तर ऐन लग्नसराईमध्ये सोनं महाग झाल्याने ग्राहकांच्या खिशाला झळ पोहचत आहे.

---

# धावत्या रेल्वेतून गांजा फेकून आरोपी पसार

## रेल्वे पोलिसांनी केला ३लाख ४१ हजाराचा गांजा जप्त...

जनसंचलन/ नांदुरा



अहमदाबादला जाणाऱ्या पुरी - अहमदाबाद या धावत्या एक्स्प्रेस गाडीतून अज्ञात आरोपीने गांजाची पॉकीटे भुईसींगा मोरीजवळ खांबा क्र. ५२२/३१,३२ च्या मध्ये बाहेर फेकुन आरोपी पसार झाला. ही घटना २० एप्रिल रोजी रात्री सव्वा आठच्या सुमारास उघडकीस आली. गाडी नांदुरा रेल्वे स्थानकावर आल्यानंतर बोगीतील काही प्रवाशांनी ही माहिती नांदुरा रेल्वे स्थानकावर उपस्थित असलेल्या रेल्वे पोलीसांना दिल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन ती पॉकीटे जप्त केली जप्त केलेल्या गांजाचे नांदुरा तहसीलदार यांच्या समक्ष वजन केले असता तो ३४ कीलो ८९ ग्रॅम भरला. पोलिसांनी ३ लाख ४१ हजार ५५० रुपयांचा सदर गांजा जप्त करून अज्ञात आरोपी विरूद्ध शेगाव रेल्वे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या बाबत प्राप्त माहितीनुसार, अहमदाबाद कडे जाणाऱ्या पुरी-अहमदाबाद या एक्प्रेस गाडीतील एका बोगीमधील अज्ञात व्यक्तीने काही बॅगा धावत्या गाडीतून रेल्वे स्थनक येण्याचा आधी बाहेर फेकुन दिल्याची माहिती २० एप्रिल रोजी रात्री सव्वा आठच्या सुमारास सदर गाडी नांदुरा रेल्वे स्थानकावर आल्यानंतर तेथे उपस्थित असलेल्या रेल्वे पोलीसांना त्या बोगीतील काही प्रवाशांनी दीली होती. या माहिती नंतर रेल्वे पोलिस लोहमार्गावर पाहणी करीत असताना त्यांना नांदुरा रेल्वे स्थानकापासून काही अंतरावर भुईसिंगा मोरीजवळ खांबा क्र. ५२२/३१,३२ जवळ काही पॉकीटे रेल्वे पोलिसांना आढळून आली. पोलिसांनी ती ताब्यात घेऊन उघडली असता त्यात गांजा आढळून आला. या नंतर पोलिसांनी तहसीलदार डिगांबर मुकुंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर गांजाचे वजन केले असता तो ३४ कीलो ८९ ग्रॅम भरला. त्याची किंमत ३लाख ४१ हजार ५५० रुपये आहे. रेल्वे पोलिसांनी सदर गांजा जप्त करून अज्ञात आरोपी विरूद्ध सी.आर. नं. १०९ / एन.डी.पी. एस. ॲक्ट २०, ८ (ब) अन्वये गुन्ह्याची नोंद केली आहे. पुढील तपास शेगाव रेल्वे पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक पंढरीनाथ मगर हे करीत आहेत.

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ७.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.५०% | ७.५०% |
| ३ | १८१ दिवस ते १६ महिने | | ८.००% | ८.००% |
| ४ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ७.००% |
| ५ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ६ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |
| ७ | सुकन्या लक्षाधिश ठेव योजना | | ८.७०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर ०.२५% टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958